विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी क्र. : २५४२ ६२७० / २५४४ ८७६८ फॅक्स : २५४४८७६८
URL: www.vpmthane.org E-mail: vpm@vpmthane.org


## जाहीर आवाहन

➢ **विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. मंडळाने १९३५ पासून मराठी प्राथमिक विभाग, १९५८ पासून मराठी माध्यमिक विभाग असलेली शाळा, १९७६ पासून इंग्रजी माध्यमाचे हायस्कूल व १९६९ मध्ये ठाण्यात पहिले कला, वाणिज्य व विज्ञान शाखांचे महाविद्यालय स्थापन केले. १९७२ मध्ये विधी महाविद्यालय, १९७३ मध्ये व्यवस्थापन शिक्षणासाठी व्यवस्थापन अभ्यास संस्था व १९८३ मध्ये तांत्रिक शिक्षणासाठी तंत्रनिकेतन संस्था चालू केल्या. वरील सर्व शैक्षणिक विभागांत आज मितीस सुमारे १५००० विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

➢ **शैक्षणिक प्रकल्पासाठी कोकण परिसराची निवड :**

महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी कोकण प्रांत म्हणून ओळखली जाते. एकाबाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजुला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील ह्या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादनक्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो. पण उत्पन्नासाठी पर्यटन व्यवसाय हा पर्याय त्यांच्या प्रगतीला पुरेसा नाही.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. भारत देशाची साक्षरतेची टक्केवारी ६५.४० आहे तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची अनुक्रमे ७८ आणि ८० टक्के आहे. तरी सुध्दा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे उच्च शिक्षणाकडे कमी विद्यार्थी प्रवेश घेतात हि आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर या विषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्यात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये उच्च शिक्षण प्रवेशाविषयी विद्यार्थ्यांमध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठया संख्येने निर्माण केली पाहिजेत असे मत मांडले. यावरून असे निदर्शनास आले आहे की, भारतामध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्याची टक्केवारी फार कमी प्रमाणात आहे. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ टक्के आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची ८.० टक्के, सिंधुदूर्ग १०.२ टक्के, गडचिरोली १०.८ टक्के आणि हिंगोली ११.७ टक्के याप्रमाणे आहे. म्हणजेच, रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वात कमी आहे.

सद्य:स्थिती विचारात घेतल्यास दिसून येईल की उच्च शिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षक वर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरांतील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच कि, अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. असे केल्याने ग्रामीण भागातील बुद्धिमान विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित रहाणार नाहीत. यासाठी आवश्यक त्या मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईलच, पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

➢ **विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पाविषयी:**

कोकणातील गुहागरजवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे. त्या गावची लोकसंख्या जवळपास फक्त ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. गाव अतिशय शांत असून मुंबई गोवा महामार्गावर असलेले चिपळूण या तालुक्याच्या ठिकाणापासून ५० कि.मी.अंतरावर आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणारा सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावांच्या बाजूने जाणारा आहे.

Contd...

➢ **नियोजित शैक्षणिक प्रकल्पाविषयी माहिती :**

नियोजित शैक्षणिक वास्तु समूहामध्ये शैक्षणिक विभागांसाठी ६ स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख, प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेल्या प्रकल्पाचा पूर्ण खर्च १५० कोटी रूपये पर्यत अपेक्षित आहे. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागातून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्रज्ञ आणि सादिलवार कामे करणारे कर्मचारी असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय प्रकल्प सुरू झाल्यानंतर दैनंदिन गरज विचारात घेता, प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींना सुद्धा वाव मिळेल.

कोकणाचे सौंदर्य आणिं पर्यटकांची आवड व आकर्षणं विचारात घेता एवढा मोठा शैक्षणिक प्रकल्प प्रस्थापित झाल्यानंतर महाराष्ट्र सरकारच्या पर्यटन खात्याला वेळणेश्वर एक मोक्याचे ठिकाण उपलब्ध होईल. प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार करून त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरूवातीला २४० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्याचे मंडळाने ठरविले आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

➢ **देणगीसाठी आवाहन :**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदती शिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणगी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

➢ **मुदत ठेवीसाठी आवाहन:**

वेळणेश्वर येथील नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रू.१० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

**अटी**

- ➢ संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रू. ५०००/- वा त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.
- ➢ सदर ठेवींचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल व किमान ३ वर्षापर्यंत ठेव परत केली जाणार नाही.
- ➢ ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.
- ➢ ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.
- ➢ सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.
- ➢ काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

अभियांत्रिकी महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून चालू होईल असा विश्वास आहे. या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रूपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.

**आपला विश्वासू,**

**डॉ. विजय वासुदेव बेडेकर**
**कार्याध्यक्ष**
**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे**